दै. गोदातीर दि. 18/02/25

# सतरा वर्षांपासून फरार असलेला आरोपी स्थागुशाच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी) –** गंभीर गुन्हे दाखल असलेले आणि सतरा वर्षापासून मुदखेड पोलिसांना पाहिजे असलेल्या फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने उमरी येथून अटक केली आहे.

मुदखेड पोलीस ठाण्याला हवे असलेले आरोपी तेजेराव ऊर्फ तेजु ऊर्फ तेज ऊर्फ नागोराव गंगाराम ऊर्फ हनुमंत चव्हाण (वय ४७) व्यवसाय-मजुरी, रा. बोळसा ता. उमरी जि. नांदेड ह.मु. पिंपळकुटा बाराळी ता. मुखेड जि. नांदेड) आणि ईरबा ऊर्फ पांडुरंग गंगाराम ऊर्फ हनुमंत चव्हाण (वय ४५ वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. बोळसा ता. उमरी.जि. नांदेड. ह. मु. इंदिरानगर कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली) स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे व पोलीस अंमलदार यांनी चंदासिंग कॉर्नर येथे अटक केली.

सदर गुन्ह्यात १७ वर्षापासुन फरार असलेले आरोपीतांना ताब्यात घेवुन नांदेड पोलिसांनी उत्कृष्ट काम गीरी केल्याबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी त्यांचे कौतुक केले आहे.